ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 3.012(IIJIF)
(UGC Approved Journal No. 63716)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

VOL. 3 NO. 6 Nov. 2017

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

**SPECIAL ISSUE**

On the Occasion of
UGC Sponsored One Day National Seminar On

## IMPACT OF GLOBALIZATION ON RURAL INDIA

21st November, 2017



*Guest Editors*

**Dr. Subhash K. Pawar**

**Mr. Vikas T. Adlok**

ORGANIZED BY

**DEPARTMENT OF SOCIOLOGY**

**LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE,**

**NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI (MS).**

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | जागतिकीकरण आणि भारतीय श्रमबाजारपेठ | प्रा. स्वाती एम. उगेमुगे | 153 |
| 18 | जागतिकीकरण आणि भारतीय शेती : एक दृष्टीक्षेप | डॉ. बळीराम प. अवचार | 156 |
| 19 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समुदायावरील प्रभाव : एक समाजशस्त्रीय अध्ययन | प्रा. सविता महाजन | 160 |
| 20 | जागतिकीकरणाचा ग्रामिण समाजावरील प्रभाव : एक समाजशस्त्रीय अध्ययन | प्रा. जयश्री घुगे | 164 |
| 21 | ग्रामीण समाजजीवनावर जागतिकीकरणाचा प्रभाव | प्रा. सागर बडगे | 168 |
| 22 | जागितिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम | डॉ. विजय नागरे | 172 |
| 23 | जागितिकीकरणाचा कृषी क्षेत्रावर पडलेला प्रभाव | प्रा. होमराज टी. रोठाड | 176 |
| 24 | जागतिकीकरणाचा भारतीय ग्रामीण सामाजिक जीवनावरील प्रभाव | प्रा. प्रदिप ल.अंबोरे | 180 |
| 25 | जागतिकीकरणाचा भारतीय शेती व्यवसायावर परिणाम | डॉ. श्रीनिवास पिलगुलवार | 182 |
| 26 | जागतीकीकरणाचा ग्रामीण भारतावरील परिणाम | प्रा. अस्मिता आर. ठोंबरे | 188 |
| 27 | जागतिकीकरणाचे ग्रामीण समाज संरचनेवर होणाऱ्या परिणामाचे समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.सुधा मु. खडके (कडू) | 191 |
| 28 | जागतिकीकरण आणि जागतिक श्रमशक्ती | डॉ. स्वराली चं. कुलकर्णी | 196 |
| 29 | जागतिकरणाचा भारतीय शेतीवर प्रभाव | प्रा. मनोहर रा. चौधरी | 200 |
| 30 | जागतिकीकरण आणि ग्रामिण समाज | डॉ. बि. पि.उबाळे | 204 |
| 31 | जागतीकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परीणाम | प्रा.अनिल बि.वानखडे | 207 |
| 32 | जागतिकीकरण आणि ग्रामीण जीवनावर प्रभाव | प्रा. दामोदर दुधे | 209 |
| 33 | जागतिकीकरण व भारतीय शेतीवरील परिणाम | प्रा.सुजाता आर.नाईक (गवई) | 211 |
| 34 | जागतिकीकरणाचा ग्रामीण व आदिवासी कामगारावरील परिणाम : समाजशास्त्रीय अध्ययनाचा नवा संदर्भ | डॉ. आनंद बनकर | 216 |
| 35 | जागतिर्कीकरणाचा भारतावरील प्रभाव - एक विश्लेषणात्मक अध्ययन | प्रा. अमरिष एस. गावंडे | 220 |
| 36 | जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील परीणाम | डॉ. सचिन ज. होले, डॉ. एस. एस. सोमवंशी | 225 |
| 37 | जागतिकीकरण आणि ग्रामीण स्त्री | प्रा. पुरुषोत्तम आर. बांडे | 228 |
| 38 | **जागतिकीकरणाचे भारतीय शेतीवरील परिणाम** | **प्रा. नंदकिशोर उ.राऊत** | 232 |
| 39 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावरील प्रभाव ... | डॉ. छाया नेम्मानीवार | 236 |
| 40 | जागतिकीकरण - ग्रामीण समाज जीवन | प्रा. दिपक सां.देशमाने | 240 |
| 41 | पर्यावरण-हास व मानवी आरोग्य : एक ज्वलंत समस्या | प्रा. राजेश पां. मेश्राम | 244 |
| 42 | जागतिकीकरणाचा ग्रामीण समाजावर पडलेला प्रभाव : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.बी.एच.किर्दक | 246 |
| 43 | जागतिकीकरणाचे सामाजिक, व्यवसायिक व राजकीय घटकांना प्रभावीत करणारे घटक | प्रा. राजेश ब्राम्हणे | 248 |
| 44 | जागतिकीकरणाचा ग्रामीण भागावर झालेल्या परिणामाचे अध्ययन | डॉ. विशाखा जगन्नाथ डेरे | 251 |

Chronicle of Humanities and Cultural Studies
(UGC Approved Journal No. 63716)
ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

28.

# जागतिकीकरण आणि जागतिक श्रमशक्ती

डॉ .स्वराली चंद्रकांत कुलकर्णी ,
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ,
नेहरू सामाजिक शास्त्रे विभाग , पुणे

भारतात शीतयुद्ध समाप्त झाल्यावर म्हणजे १९९० मध्ये जागतिकीकरणाची सुरवात झाली .याकाळात भारतावर विदेशी कर्जाचे मोठे ओझे असल्याने जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ह्या संस्थांनी भारताला कर्ज देताना भारतावर काही अति लादल्या .भारतीय अर्थव्यवस्थेत काही धोरणात्मक बदल करून विदेशी कंपन्या साठी खुली करण्यासाठी भारतीय अर्थव्यवस्थेत काही बदल केले गेले .यामध्ये खाजगीकरण आणि उदारीकरण यांचा समावेश होता .यालाच खाजगी उदारवादी जागतिक धोरण असे म्हटले जाते .आज जागतिकीकरणामुळे सर्व जग जवळ आले आहे .जगातील कोणतीही माहिती क्षणार्धात आज आपणास मिळते . जागतिकीकरण पाहत असताना आपणास मानवी विकासाचा टप्पा पाहणे क्रमप्राप्त ठरते .मानव रानटी अवस्थेत असताना अन्न,वस्त्र , निवारा यागोष्टीसाठी तो अनुक्रमे शिकार ,जनावरांची कातडी आणि गुहा यावर जगात असे हळूहळू मानवाने जसा विकास करण्यास सुरवात केली तसतसे त्याचे जीवन बदलात गेले .त्यानंतर तो नदीच्या काठी समूहाने राहू लागला .मानवाने हळू हळू धान्य पिकविणे , घरे बांधणेंआणि वस्त्र निर्माण अशी प्रगती केली .

त्यानंतर शेतीसाठी लागणारी अवजारे ,सोने ,चांदी लोखं यासारखे धातू आणि स्वसंरक्षणासाठी सैन्याची गरज मानवी समाजाला भासू लागली .हळूहळू मानवी संस्कृतीचा विकास झाला . परंतु मानवी समाजाच्या गरजही मोठ्या प्रमाणात वाढू लागली यातून गरज पूर्ण होण्यासाठी वस्तू विनिमयाचे पद्धत सुरु झाली .शेत करणे , वस्तू बनविणे ,,अवजारे बनविणे ,दागिने घडविणे हे एक माणसाला शक्य नव्हते किंवा त्याच्याकडे हे सगळे कौशल्य असणे शक्य नव्हते त्यामुळे ज्याज्या व्यक्तीकडे ती ती वस्तू बनविण्याचे चांगले कौशल्य त्याच्याकडून ती वस्तू घेण्यास सुरवात झाली यातून इतरांबरोबर देवाणघेवाण करावी म्हणजे सगळ्यांना चांगल्या दर्जाच्या वस्तू किंवा सेवा मिळतील आणि यामुळे सर्व समाजाच्या गरजही पूर्ण होतील अशा प्रकारची संकल्पना गाव ,किंवा देशात निर्माण होत असलेली वस्तू किंवा सेवा आणि मनुष्यबळ यांची देवाणघेवाण कोणत्याही आडकाठीशिवाय जगभरात कुठेही होऊ शकते याला जागतिकीकरण म्हटले जाते .

जागतिक बाजारपेठेत एक जागतिक श्रमशक्ती निर्माण झाली आहे .ती वस्तू साखळल्याच्या उत्पादनावर विखुरलेली आहे .मैदानी खेळाच्या पादत्राण उद्योगामध्ये ढब किंवा रचना करणारा , विपणन करणारा प्राथमिक श्रमिक अमेरिकेमध्ये राहत होता .परंतु सिंथेटिक साहित्य उत्पादित करणारा , रंग देणारा , कापणारा आणो शिवणकाम करणारा .,जुळवणूक करणारा ,पॅकेजिंग करणारा , वाहतूक करणारा श्रमिक किंवा मजूर हा अकुशल असे .हि कामे द. कोरिया , तैवान ,चीन ,इंडोनेशिया आणि फिलिपाइन्स महिलांकडून केली जात असत .आज उद्योग संस्थांना उत्पादनाची पुनर्स्थापना करणे गरजेचे झाले आहे .जश्या फॅशन आणि डिझाईन बदलतात तसतसे उत्पादन स्थान , उत्पादन खर्च आणि व्यवस्थापन नमुना बदलतो .जागतिक बाजारपेठेत जगभर शेतमजूर आणि शेतकरी यांच्याकडून संयुक्त किंवा सामुदायिक करार अंतर्गत अधिकाधिक फळे आणि भाजीपाला उत्पादित करून घेतला जातो. सफरचंद चिली देश सफरचंद ,द्राक्ष ,आप्रिकॉट , पिचेस तर मेक्सिको टोमॅटो , काकडी अमेरिकेला निर्यात करते .थायलंड जपानची अननस तर केनिया स्ट्रॉबेरी ,मिस्वी आणि आंबे युरोपला निर्यात करते .अलीकडे जसजसे जागतिक ग्राहकांचे केंद्रीकरण व संख्या वाढते आहे तसतसे उत्पादनाचा आकार आणि फायद्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात विस्तृत होत आहे . पुरुषांपेक्षा स्त्री मजूर अधिक विश्वासाहार्यअसतात . त्यामुळे करारी शेती बहुतांशी महिलांकडून केली जाते .फळे आणि इत्तर कामे महिला कार्यक्षमतेने पार पडतात .महिला हुअंगामी आणि मध्यंतर रोजगार कामासाठी (कंपनी प्रक्रिया

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

,आणि पॅकेजिंग ), लवचिक कामासाठी आवश्यक आणि अधिक योग्य समजल्या जातात .जगातील बहुतेक निर्यात प्रवण भागात (EPZ )श्रमिकांमध्ये स्त्री आहेत .मेक्सिकोत तरुण महिलांचा एकूण श्रमशक्तीत शे ,८५ हिस्सा मोक्विलॅडोर्स मध्ये आहे कारण महिला कामगार अधिक चपळ, आज्ञाधारक आणि पुरुषांपेक्षा अधिक विश्वासू आणि निश्चितच स्वस्त असतात .जेव्हा मोटरलने त्याचे इलेक्ट्रॉनिक्स सयंत्र फिओनिक्स पासून नोगल्स पर्यंत दक्षिणेकडे २०० मैलांवर हलविले .तेव्हा त्याचे वार्षिक जोडणी कामाचे वेतन ५३५० डॉलरपासून १०६० डॉलरपर्यंत काम झाले .

तिसऱ्या जगातील सरकारांनी त्यांना वसाहतवादापासून स्वातंत्र्य प्राप्त झाल्यावर देशांतर्गत औद्योगिकरणाच्या मार्ग स्वीकारलं आणि त्यामुळे त्यांचे व्यापारी ,शेतकरी ,सार्वजनिक क्षेत्रातील नोकरदार , नागरी उद्योगपती ,व्यापारी आणि संघटित कामगार जे औद्योगिकरण व्यूहरचनेचे मुख्य लाभार्थी होते . त्यांच्यावरील विकासनशीलतेचे अवलंबित्व वाढले . हे अवलंबित्व बऱ्यापैकी नागरी पायावर आधारभूत होते .आणि १९८० मध्ये त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर श्रमविभागणीत यश प्राप्त झाले . जरी पूर्वापार तिसऱ्या जगातील देश प्राथमिक वस्तूंचे पहिल्या जगाला पुरवठा करणारे देश होत्र . त्यांचा जागतिक कृषी निर्यातीतील हिस्सा १९५० मध्ये शे .५३ होता तो १९८० मध्ये शे . ८१ पर्यंत घटला.दुसऱ्या बाजूला अमेरिकेची जगाच्या न्यहारीची टोपली म्हणून वाढत होते त्याचा जागतिक गव्हाच्या निर्यातीत शे , ३६ , मक्याच्या निर्यातीत शे .७० आणि सोयाबीन निर्यातीत शे .५९ हिस्सा झाला .अशाप्रकारे वसाहतवादातील असलेल्या श्रमाच्या स्वरूपातील सामाजिक श्रम विभागणीची नव्याने नव्याने काही प्रमाणात पुनर्निर्मिती झाली . जरी आजसुद्धा तिसऱ्या जगातील राष्ट्र त्यांच्या प्राप्ती साठी कृषी निर्यातीवरच अवलंबून असले तरी त्यांच्या उद्योगधंद्यांच्या तुलनेत देशांतर्गत स्थूल राष्ट्रीय उत्पादनात कुशीचा हिस्सा कमी झाला असला तरी तसेच जागतिक उत्पादनाच्या पसरलेल्या जाळ्यातही त्यांचा हिस्सा कमी झालेला असला तरी सामाजिक श्रमविभागणी बरोबरच आता तांत्रिक श्रमविभागणीही घडून आली .व त्यासोबत उतरंडीसारखी जागतिक उत्पादन व्यवस्था निर्माण केली आहे . अकुशल कामगारांचे जसे कापड किंवा पादत्राण उद्योगातील कापणे , शिवाने इ चे कार्यात पुनर्व्यवस्थापन घडून आले . हे तिसऱ्या जगातील प्रशात कुशल व्यवस्थापनाच्या गरजांबरोबरच नवीन तंत्रज्ञनच्या विकासासोबत घडून आले .त्याबरोबरच आणखी वैज्ञानिक दृष्टी इंजिनियरिंग तांत्रिक श्रमिक हेही अकुशल कामगारांबरोबर आवश्यक ठरू लागले .एक नवीन संकल्पना (नवीन आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी )NIDL ) असे जगातील स्वस्त श्रम प्रदेशातील अल्प कुशल कामगारांच्या पुनर्स्थापनेच्या वैशिष्ट्याला नाव दिले जाते .तिसऱ्या जगातील स्वस्त मजुराचा अनंत पुरवठा तिसऱ्या जगाला अकुशल उत्पादन परकीयांचे तंत्रज्ञानाच्या पुनर्वाटपाच्या शक्यता आणि जागतिक उद्योगसंस्थांच्या कार्याशी संलग्न होण्यासाठी वाहतूक ,दळणवळण आणि संघटनात्मक तंत्रज्ञान विकास यामुळे आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी उदय झाला . तसेच हेही लक्षात ठेवायला हवे कि विकासनशीलतेचे तिसऱ्या जगाने स्वीकारलेले अवलंबित्व विकासनशील राज्यांनी त्यांच्या नागराने विकासाबाबत प्राधान्य दिले असल्याने ग्रामीण समुदायाला त्याची झाल बसली . जमीनदारांनी जमिनीची मालकी काढून घेतली त्यामुळे शेतकऱ्यांनी नागरी विभागासाठी स्वस्त श्रमशक्ती पुरवली कि ज्याच्यामुळे औद्योगिक पाय निर्माण होईल. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे पूर्व आशियायी नव्याने औद्योगिक राष्ट्रांनी (NICS )त्यांचे औद्योगिक संपत्तीचे पुनर्वाटप करण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा काही हिस्सा त्यांच्या श्रमशक्तीचे कौशल्यात सुधारणा होण्यासाठी पुणेरी गुंतविण्याचाही प्रयत्न केला

जेव्हापासून निर्यात वृद्धी ज्यांनी स्वीकारली अशा अन्यराष्ट्राच्या तुलनेत आशियायी नव्याने औद्योगिक राष्ट्रातील मजुरांची पातळी वाढली तेव्हापासून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकीद्वारे त्याच्या करुशक्तीच्या कौशल्यात सुधारणा करणे आवश्यक ठरले . जर अमेरिकेत तासिकेप्रमाणे एलेक्ट्रॉनिक्सचे काम १०० मोजले जात असेल तर तेच काम हॉंगकॉंगमध्ये १२ , मलेशियामध्ये ९ ,तैवानमध्ये ७ ,फिलिपिन्स मध्ये ६ आणि इंडोनेशियामध्ये ५ होते .ह्या वेतन भिन्नतेमुळे पूर्व आशियायी नव्याने औद्योगिक राष्ट्रांना अल्पस्पर्धात्मक श्रमप्रधान उत्पादक बनविले आणि जागतिक श्रमशक्तीतील त्याच्या हिस्साच्या श्रमशक्तीची गुणवत्ता वाढविणे आवश्यक आहे .या कार्यकुशलतेतील वृद्धीमुळे पूर्व आशियायी नव्याने औद्योगिक राष्ट्रांना निश्चित उद्योगांचे प्रादेशिक मुख्य कार्यालय बनणे शक्य झाले . १९७० मध्ये

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

उपांत्य विद्युकवाहक द. पूर्व आशियात एकत्रित करून अमेरिकेत चाचणीसाठी आणि वाटपासाठी पाठविले जात परंतु उपांत्य विद्युतवाहकांच्या अंतिम चाचणीचे ठिकाण बनले .एका बाजूला कौशल्यातील वृद्धीबरोबरच दुसऱ्या बाजूला जागतिकीकरणाने श्रमास अनावश्यक प्रेरणा दिली .त्यापैकी काही भांडवलशाही उत्पादन पद्धतीच्या चक्रीय स्वरूपामुळे जिच्यात उद्योग संस्था बाजारपेठेत स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शारामाला महत्व प्राप्त झाले .परंतु श्रमाचा काही हिस्सा औद्योगिकरणामुळे आहे हे विसरून चालणार नाही .स्वस्त श्रमशक्ती जिचा लोंढा शहराकडे आणि नगरांकडे प्रवाहित होत होता तो विदेशी गुंतवणुकीला आकर्षित करत होता .या गुंतवणुकी जागतिक किंमती कमीत कमी करण्याचा उच्चान्क गठीत होत्या अशा उद्योगसंस्थांच्या होत्या .

देश ज्या कार्याच्या बाबतीत उत्तमोत्तम काम करू शकतो असे कौशिल्य किंवा आर्थिक कार्याच्या स्वरूपात त्या राष्ट्राने विशेषीकरण करून राष्ट्रांची भरभराट घडवून आणावी . तुलनात्मक लाभ सिद्धान्तर्गत आंतरराष्ट्रीय भर्व्हरट हि देशादेशांतील अधिकाधिक कार्यक्षम विनिमयातून प्राप्त होऊ शकते . हा विनिमय त्या त्या देशाच्या वस्तू आणि सेवांच्या तुलनात्मक लाभातून घडून येईल .तिसऱ्या जगातील राष्ट्रांमधील स्वस्त मजूर तुलनात्मक लाभात महत्वाची भूमिका पार पडत असतो .उत्तर अमेरिकेत मुक्त व्यापार करारांतर्गत राष्ट्रांमध्ये अमेरिकेमधील आणि मेक्सिकोमधील मोठ्या प्रमाणावर वेतन भिन्नता आहे .त्यामुलर कपड्यांचे उत्पादन करणाऱ्या अमेरिकन उत्पादन संस्था ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्स आणि अन्नप्रक्रिया उद्योग इ .१९८० पासून मेक्सिकोकडे स्थलांतरित झळझ त्यानंतर तो पुढे दक्षिणेकडे होऊ लागला यामुळे साहजिकच मोठ्या प्रमाणावर पहिल्या जगातल्या देशात बेरोजगारी वाढू लागली .स्वस्त अकुशल श्रमाच्या शोधामुळे ओराथम तिसऱ्या जगातील कपडे , कापड ,फर्निचर ,प्लास्टिक इ .उद्योगधंद्याची पुनर्स्थापना झाली .त्यानंतर १९८० मध्ये आदिक कौशल्य असलेल्या उद्योगधंद्याचे जसे जहाजबांधणी ,स्टील ,मशिनरी आणि सेवा याची पुनर्स्थापना झाली . अमेरिका ,युनायटेड किंग्डम , जपान पासून प्रमुख उद्योगांचे तिसऱ्या जगातील पुनर्स्थापनेत पहिल्या जगातील उद्योगाच्या बाहेर पडण्याने पोकळी निर्माण झाली होती . याकाळात सेवाक्षेत्रातील रोजगारसुद्धा पुनर्स्थानिकार्णाचे संरक्षण करू शकला नाही .अमेरिलरतील माहिती प्रक्रिया , विमा , आरोग्य उडतोग , ग्राहक वित्त , किरकोळ उद्योजकसंस्था इ .तील नोकर्यांच्या संधी मोठ्या प्रमाणात क्रॉबियां बेटावर अतिशय अल्प मूल्यात स्थलांतरित झाले .स्विस्सपेराने तिची संपूर्ण प्राप्ती किंवा महसूल मुंबईत हस्तांतरित केला .आणि अनेक सॉफ्टवेअर उद्योगसंस्थांनी उपकरारी श्रमप्रधान प्रोग्रामिंग बेंगलोरला दिले .अमेरिकेत २.३ मिलियन कारखानदारी नोकऱ्या १९८० -०८५ च्या दरम्यान अदृश्य झाल्या .१९९० च्या सुरवातीला इंडोनेशिया तील पादत्राण उद्योगात काम करणारा कामगार प्रामुख्याने महिला प्रत्येक दिवशी १.०३ डॉलर उत्पन्न मिळवीत होत्या .त्याच्या तुलनेने अमेरिकेत याच कामाला सरासरी ६ .९४ डॉलर प्रत्येक तासाला द्यावे लागतात .१९७० पासून ब्रिटनमध्ये शे .५० ,अमेरिकेत शे .८ ,फ्रांस शे. १८ ,जर्मनीमध्ये शे १७ ने घट झाली .आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेतील (OECD ) देशामध्ये ३५ मिलियन लीक १९९३ मध्ये प्रत्यक्ष बेरोजगार होते .युरोपच्या पूर्वी साम्यवादी असलेल्या देशातील बेरोजगारीचे प्रमाण आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेतील देशापेक्षा दुप्पट होते परंतु विकासनशील देशामधील श्रमाची स्थितीही चांगली नव्हती .आंतरराष्ट्रीय संघटनेच्या १९९८ - ९९ च्या जागतिक रोजगार अहवालानुसार एकूण जागतिक श्रमशक्तीपैकी ३ बिलियन शे .२५ -३० न्यून बेरोजगार होते .आणि जवळजवळ १४० मिलिया संपूर्णपणे बेरोजगार होते .श्रीमंत देशाचे सरासरी दरडोई उत्पन्न १९७० मध्ये गरीब राष्ट्राच्या ११ पॅट होते ते १९८५ मध्ये ५२ पॅट झाले अमेरिकेमध्ये जगभरातून श्रमिक येतात .प्रामुख्याने मेक्सिको ६० ,आशिया २२.१ , युरोप ७.३ ,द. अमेरिका ५.६ आणि आफ्रिका २.३ (सर्व १९९० आणि शे ). जागतिकीकरण मोठ्या प्रमाणावरील औदोगिकीकरण आणि कृषीतून शेतकऱ्यांच्या मुळापासून उखडून टाकण्यामुळे शिवाय त्याने नागरी श्रम बाजाराच्या अनौपचारिकतेला वेग दिला आहे .एकीकडे व्यावसायिक आणि व्यवस्थापकीय वर्ग जागतिक प्रवाहात सहभागी होत आहे (पैसा,उत्पादने , इलेक्ट्रॉनिक ,दळणवळण , अतिवेगवान वाहतूक यांच्यातील सहभाग) तर दुसरीकडे या प्रवाहामुळे बाजूला फेकलं गेलेला वर्ग आहे . तो वर्ग श्रमशक्तीतील कपातीचा वर्ग , रचनात्मक दृष्टीने बेरोजगार झालेला स्थलांतरित आणि आश्रित वर्ग जो जागेभोवती असलेल्या शहरी झोपडपट्टी आणि इत्तर वस्त्यांतून

ISSN: 2454-5503
Impact Factor: 3.012 (IIJIF)

राहतो .एकंदरीत आज जागतिकीकरणामुळे श्रमिकांची परिस्थिती दयनीय झालेली आहे तर काही ठिकाणी ती चांगली असल्याचेही जाणवते

**Sources:**

1.Global financial crisis and the Indian economy .S. Asokkumar. New Century Publication , New Delhi , 2010

2.Globalization , Liberalizaion and Economic development , Vasudeo Sahoo. New Century Publication . New Delhi.2013

3.Principles of Social &Political theory. Barker Earnest . Oxford University Press,1954

4.Why enequality matters in Globalizing world . Birdball N,Wider Annual Lecture .1954

5.Displacement,Rehabilitation and social change .Patnaik S.M., Inter India Publication, 1996

6.Fiscal and Monetary Policies and Problems in developing Countries. Prime Eshag. Cambridge University press ,1985

7.The Argumentive Indian . Sen Amarty . Oxford University Press , Pengain Book , 2005

8.Resource values and Development . Sen Amarty . Oxford University Press . Delhi . 1984

9.Structural ChangEs in india. Singh Ghan Sham . Har Anand Publication .New Delhi .1991

10.Globalization and Farmer.Industries. Co Operative Banks in India . V.V. Ghanekar. Institute of Rural development & Education . Pune. 2010

11.Micro Finance and poverty reduction , Johnson and B. Regaly , Oxford Oxam. 2001

12.Using evidence of Household income Diversificationof to study of Rural Non farm Labour Market in Africa. Reardon T.World Development Vol-3. 1997

❑❑❑